
2017-18

UGC Approved Sr. No. 49366

SRJIS

Online ISSN -2278-8808
Printed ISSN- 2349-4766

GLOBALLY INDEXED
IMPACT FACTOR SJIF 2016 6.177




An International Peer Reviewed

Referred Quarterly

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

OCT-DEC , 2017. VOL. 6, ISSUE -34

5

EDITOR IN CHIEF : YASHPAL D. NETRAGAONKAR, Ph.D.

SJIF 2016 = 6.177

Online ISSN 2278-8808 Printed ISSN 2349-4766

An International, Peer Reviewed, & Referred Quarterly

# Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

**OCT-DEC, 2017, VOL-6, ISSUE-34**

266 भारतीय शेतीची आधुनिकता आणि सद्यस्थिती
*प्रा. डॉ. कदम प्रमोदिनी विठ्ठल (1173-1181)*

267 मानव संसाधन व्यवस्थापन :– श्रमशक्तीचा आदर्श स्त्रोत
*डॉ. डी.एस. पाटील (1182-1188)*

268 भारतातील कृषि क्षेत्र आणि कर्जपुरवठा
*प्रा.डॉ. अरुण तवार & प्रा.डॉ. शिवाजी पाते (1189-1192)*

269 औद्योगिक विकासात खाजगी क्षेत्राचे योगदान
*प्रा. डॉ. आर. डी. भोसले (1193-1196)*

270 भारतीय शेतीसमोरील आव्हाने आणि शेती विकास
*प्रा. डॉ. कृष्णा शंकर शहाणे (1197-1202)*

271 मानव विकास निर्देशांक व भारतीय मुस्लिम समाज– अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालूक्यातील शहरी भागाचा एक व्यष्टी अध्ययन
*प्रा. डॉ. विजयकुमार तावळे, शायिन यासिन शेख (1203-1209)*

272 भारतीय अर्थव्यवस्था आणि नोटबंदी एक अभ्यास
*अनंत श्रीराम राठोड (1210-1213)*

273 वस्तू व सेवा करांचा लघू व मध्यम उद्योगांवर पडणारा प्रभाव
*प्रा. डॉ. सावंत रजनी नामदेवराव (1214-1216)*

274 कातकरींचा सामाजिक दृष्टीकोन : एक अभ्यास
*डॉ. आर. के. दातीर & श्री. विनायक तु. खातळे (1217-1220)*

275 भारताचे विदेश व्यापार धोरण : निर्यात वद्धीतील प्रमुख अडथळा ?
*प्रा. डी. डी.गव्हाणे & प्रा. डॉ. एस. जी. वैद्य (1221-1226)*

276 अहमदनगर जिल्ह्यातील नगरपालिकांच्या महिला व बालकल्याण विभागाच्या योजनांचा चिकित्सक अभ्यास
*संगिता रामेश्वरलाल जांगीड & प्रा.डॉ.ए.एम.पवार (1227-1229)*

*प्रा. डॉ. सावंत रजनी नामदेवराव (1214-1216)*

# वस्तू व सेवा करांचा लघू व मध्यम उद्योगांवर पडणारा प्रभाव

**प्रा. डॉ. सावंत रजनी नामदेवराव**

*अर्थशास्त्र विभाग प्रमुख श्रीमती पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालय, मालेगांव कॅम्प ता. मालेगांव जि. नाशिक*

**प्रस्तावना** :एक देश, एक कर असलेल्या वस्तु व सेवा कर पध्दतीमुळे उद्योग सुरु करण्यास अनुकूल वातावरण तयार होत असल्याने गुंतवणुक वाढणार आहे. भारतात १ जुलै २०१७ पासुन वस्तु व सेवा कर लागु झाल्यामुळे देशाच्या इतिहासात वस्तु व सेवा कर ही प्रणाली क्रांतिकारी पाऊल म्हणुन ओळखले जाणार आहे. जीएसटी हा निश्चित स्वरुपाचा वस्तु व सेवांवर आधारित उत्पादन ते ग्राहक अशा प्रवागातील एकमेव कर असुन केंद्र तसेच राज्य शासनाच्या अप्रत्यक्ष करांना तो पर्याय असुन देशभर एकच बाजारपेठ उभारणारा कर आहे. जीएसटीच्या अनेक फायदयापैकी एक फायदा असा की, कर संदर्भातील सुधारणा करतांना व्यवसाय करण्याची सुलभता यामुळे येणार आहे. करपध्दतीची पूर्तता होणार आहे करांवर कर मोडीत निघणार असुन कराचे ओझे कमी होणार आहे. कर प्रशासनात सुधारणा होणार आहे. करचुकवेगिरीलाही आळा बसणार आहे. कर पध्दतीचा या अर्थशास्त्रीय परिभाषेत विस्तुत होणार असुन कररुपी उत्पन्नामध्ये भरीव वाढ होणार आहे. मोठया कंपन्यांना छोटया व्यवसायांशी स्पर्धा करतांना पूर्वी एक गोष्ट सतावायची सगळे कर भरत नसल्यामुळे छोटे उद्योग कमी किमतीत माल देवु शकायचे मात्र आता असे कर चुकवता येणार नाहीत. पुरवठा करणाऱ्या पूर्ण साखळीलाच कर आकारणे आणि इनपुट, क्रेडिट घेणे कायदयाचे ठरणार असल्यामुळे आगामी काळात छोटे व मोठे उद्योगही कर भरण्यासाठी प्रवृत्त होतील यामध्ये जास्तीत जास्त उलाढाल वैध मार्गाने केल्यामुळे छोटया व्यवसायाचे ताळेबंद अधिक पारदर्शक होतील. त्यामुळे आज अनेक छोटे उद्योग यासाठी पात्र ठरतील पतपूरवठा झाल्याने त्यांच्या उद्योगांच्या वाढीला मोठीच चालना मिळेल. करचुकवेगिरी अत्यंत कमी झाल्याने देशाची अर्थव्यवस्था मजबुत होईल.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. जीएसटी मुळे लघु व मध्यम उद्योगांवर पडणारा प्रभाव अभ्यासणे.

२. जीएसटी प्रणालीत लघु व मध्यम उद्योगांच्या समस्या दुर करण्यासाठीच्या तरतुदींचा अभ्यास करणे

**संशोधन पध्दती** : हा लेख तयार करतांना व लेखाचा आढावा घेतांना संबंधीत विषयातील दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. त्यात प्रामुख्याने विषयाशी संबंधित संदर्भ

पुस्तके, मासिके, वृत्तपत्रे, अहवाल व संकेत स्थळांचा वापर करण्यात आला आहे. वस्तु व सेवा कराचा सर्वात जास्त प्रभाव लघु व मध्यम स्वरुपातील उद्योगावर दिसुन येण्याची शक्यता आहे. सध्या भारतात मोठया सख्येने लघु व मध्यम भांडवल असलेले उद्योग अर्थव्यवस्थेच्या मुख्यपरिघापासुन दूर देशाच्या कानाकोपऱ्यात इतरत्र विखुरलेल्या आहेत, म्हणजेच अनेक लहानसहान उद्योग व्यापारी कायदे व उद्योगावरील करनियमांना चुकवून व्यापार करीत आहेत. करचुकवेगिरीमुळे या उद्योगाना एकुण खर्च कमी लागतो पण हे कायदयाला अनुसरुन ठरत नाही. एखाद्या लघु उद्योजगाने दुसऱ्या वस्तु व सेवा कराच्या नेटवर्कमध्ये नोंदणी केली व योग्य कर भरला तर वस्तु व सेवा करातील इनपुट केडीट योजनेचे लाभ मिळतील व या तरतुदीमुळे ग्राहकही केवळ वस्तु व सेवा कराचा व्यापारी साखळीत नोंदणी केलेल्या व्यापाऱ्यांकडुन वस्तु विकत घेण्याचे प्रमाण वाढेल यामुळे सर्वच स्तरातील व्यापाऱ्यांना वस्तु व सेवा कराच्या नेटवर्कमध्ये आपल्या उद्योगाची नोंदणी करणे अनिवार्य होईल. यातुनच करचुकवेगिरीला आळा बसुन अर्थव्यवस्थेतील सर्व घटकांना नव्या करपध्दतीचे त्यांच्या वाट्याचे सर्व लाभ मिळतील. देशात बरेचसे लघु व मध्यम उद्योग असेही आहेत की जे पूर्वीपासूनची कर प्रणाली नियमितपणे पाळत आहेत. हे उद्योग जेव्हा आता वस्तु व सेवा कर प्रणालीत नोंदणी करतील तेव्हा सुरुवातीच्या काळात या उद्योगांचा एकुण खर्च अधिक राहिल परंतु असे असले तरी देखील यामुळे देशाच्या कर पध्दतीचा पाया अधिक व्यापक होवुन त्यामुळे शासनाला कराच्या माध्यमातुन मिळणारे उत्पन्न वाढेल ज्याप्रकारे संपूर्ण कर प्रक्रियेत मुल्यवर्धक होईल. त्यानुसार मालाच्या किंमतीही वाढतील व त्यांचे लाभ उद्योगांना मिळतील. जीएसटीच्या अंमलबजावणीमुळे उद्योगधंदयांना एक यंत्र मिळणार असुन कर पूर्ततेमध्ये सुटसुटीतपणा येणार आहे. कराचे ओझे कमी होणार आहे. त्याचप्रमाणे कर परताव्याची प्रक्रिया सोपी होणार आहे. जीएसटी ही वरवर पाहता खुप सोपी आणि सुटसुटीत कर प्रणाली वाटत असली तरीही सर्वच उद्योग आणि व्यावसायिकांना निरनिराळे रिटर्न्स भरताना नाकी नऊ येणार आहेत. एखाद्या उत्पादकांच्या चार शाखा चार वेगवेगळया राज्यांत असतील आणि त्यांचे उत्पादक अनेक राज्यांत वितरित केले जात असेल तर त्याला यापूढे या सर्व ठिकाणी जीएसटी अंतर्गत स्वतंत्र्य नोंदणी करावी लागेल तसेच त्या राज्यात रिटर्न्स भरावे लागणार आहेत. बॅकांना त्यांचा देशभरातुन शाखांतुन विविध सेवा पुरवतांना त्या राज्यातील नोंदणी आवश्यक ठरणार आहे. तसेच कर प्रणालीमुळे दर महिन्याला अनेक प्रकारची कर विवरणपत्रे भरावी लागणार आहेत.मुख्यत: असंघटीत आणि लघू व मध्यम उद्योग व्यवसाय क्षेत्रांच्या एकुण व्यवस्थापन खर्चामध्ये यामुळे वाढ होणार आहे. आतापर्यंत ज्याची उलाढाल दिड कोटी रुपयाच्या वर होती त्यांना एक्साईज भरावा लागत होता. यापूढे ज्यांची उलाढाल २० लाखांच्यावर आहे अशा उद्योगांना जीएसटी लागु आहे. आर्थिक वर्ष उलटल्यानंतर तीन महिन्यांनी सुरु होणाऱ्या या

नविन कर रचनेमुळे लघु उद्योजकासाठी या सर्व कागदपत्राची पुर्तता करण्याचा खर्च आणि त्रास त्यामुळे वाढणार आहे

**लघु आणि मध्यम उद्योगांना संरक्षण** : जीएसटी प्रणालीत लघु आणि मध्यम उद्योगांच्या समस्या दुर करण्यासाठी अनेक तरतुदी करण्यात आल्या आहेत. आर्थिक वर्षात २० लाखापेक्षा कमी उलाढाल असलेल्या व्यावसायिकांना जीएसटी नोंदणीतुन वगळण्यात आले **आहे. (काही राज्यात ही तरतुद दहा लाख आहे). लघु उद्योगांना जीएसटी नोंदणीतुन** वगळण्यात आले आहे. तसेच जीएसटी अंतर्गत तिमाही रुपये ७५ लाख उलाढाल असलेल्या व्यावसायिकासाठी नुकसान भरपाईची तरतुद करण्यात आली आहे. यात व्यापारी आणि उत्पादक तसेच हॉटेल व्यावसायिकांना सहभागी होता येते. या योजने अंतर्गत उत्पादकांना १ टक्के दर, हॉटेल व्यावसायिकांना २.५ टक्के दर आणि व्यापाऱ्यांना ०.५ टक्के दराने एसजीएसटी आणि सीजीएसटी अंतर्गत लाभ मिळेल मात्र या योजनेसाठी आंतरराज्य व्यापार करणारे व्यावसायिक पात्र नाहीत.

प्रस्तुत लेखात या कर पध्दतीचा लघु व मध्यम उद्योगांवर काय व कसा प्रभाव पडेल व या प्रणालीत लघु व मध्यम उद्योगांच्या समस्या दुर करण्यासाठीच्या तरतुदी मांडण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**सारांश** : आर्थिक पाहणी अहवाल २०१६–१७ नुसार उद्योगक्षेत्राचा राज्याचा उत्पन्नात ३४ टक्के एवढा वाटा आहे. जीएसटी मध्ये एकच प्रकारचा कर भरावा लागणार असल्यामुळे व्यापारी वर्गाला अनावश्यक त्रास होणार नाही व या क्षेत्राला चालना मिळेल उत्पादक, पुरवठादार यांच्याकडुन उपभोक्ता, किरकोळ विक्रेते यांच्यामार्फत कर जमा करण्यासाठी सरळ विनाअडचणींच्या पध्दतीमुळे प्रत्येक स्तरावर कर भरावा लागणार नाही. यामुळे व्यापारी व उद्योग क्षेत्राला अधिक चालना मिळेल यामुळे पर्यायाने राज्याच्या उत्पनात वाढ होण्यास चालना मिळेल.

**संदर्भ** :


१. *योजना ऑगस्ट २०१७.*
२. *व्यापारी मित्र सप्टेंबर २०१७.*
३. *लोकप्रभा ७ जुलै, २०१७.*
४. *विवेक साप्ताहिक एप्रिल २०१७.*
५. *उद्योजक ऑगस्ट २०१७.*
६. *ण्हजणणद*
७. *ण्हजबबनदबपसणहबअणपद*